सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९३८ चा मुंबई अधिनियम, क्रमांक २२

# मुंबई समपहृत केलेल्या जमिनी परत करणे अधिनियम, १९३८

( १५ नोव्हेंबर २००६ पर्यंत सुधारित )

**Bombay Act No. XXII of 1938**

# The Bombay Forfeited Lands Restoration Act, 1938

*( As modified up to 15th November 2006)*

*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद यांनी मुद्रित केले व संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

२००६

[ किंमत : रुपये ३.०० ]

# मुंबई समपहृत केलेल्या जमिनी परत करणे अधिनियम, १९३८

## अनुक्रमणिका


उद्देशिका

| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ .. | १ |
| २. | व्याख्या .. | १ |
| ३. | न्यायाधिकरणाची रचना .. | २ |
| ४. | पुनःस्थापित करण्याची गरज असलेली जमीन, घोषित करणे .. | २ |
| ५. | हितसंबंधित व्यक्तींना नोटीस .. | २ |
| ६. | विवरणपत्रे, इत्यादी करण्यास फर्मावण्याचा व भाग पाडण्याचा अधिकार .. | २ |
| ७. | न्यायाधिकरणाद्वारे चौकशी व निवाडा .. | ३ |
| ८. | न्यायाधिकरणासमोरील कार्यपद्धती .. | ३ |
| ९. | नुकसानभरपाईची रक्कम .. | ३ |
| १०. | नुकसानभरपाईच्या रकमांचे प्रदान करणे .. | ४ |
| ११. | नुकसानभरपाईच्या रकमा देण्याऐवजी दुसरी व्यवस्था करणे .. | ४ |
| १२. | प्रदान करावयाची रक्कम किंवा व्यवस्था अंतिम आणि निर्णायक असणे .. | ५ |
| १३. | प्रतिज्ञापत्रानंतर घ्यावयाचा जमिनीचा ताबा आणि जमीन पूर्णत: प्रांतिक शासनाकडे निहित करणे. .. | ५ |
| १४. | नियम .. | ५ |

# मुंबई समपहृत केलेल्या जमिनी परत करणे अधिनियम, १९३८

[सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२][१]

[दि. २९ नोव्हेंबर १९३८]

**शासनास देय असलेल्या जमीन महसूलाचे व इतर रकमांचे प्रदान न केल्याबाबत सविनय कायदेभंगाच्या चळवळीच्या कालावधीत समपहृत केलेल्या जमिनी परत करण्याची तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** शासनास देय असलेल्या जमीन महसुलाचे व इतर रकमांचे प्रदान न केल्याबाबत सविनय कायदेभंगाच्या चळवळीच्या परिणामी जमिनी समपहृत केल्या होत्या ; आणि **ज्याअर्थी,** उक्त जमिनी, अपुऱ्या मोबदल्यात काही व्यक्तींना देऊन त्यांची विल्हेवाट लावली होती ;

**आणि ज्याअर्थी,** त्यांच्या मूळ धारकांना त्या परत करण्याच्या दृष्टीने, त्या संपादन करणे न्याय्य व इष्ट आहे ; **त्याअर्थी,** या द्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

१. (१) या अधिनियमास, मुंबई समपहृत केलेल्या जमिनी परत करणे अधिनियम, १९३८, असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) त्याची व्याप्ती, संपूर्ण मुंबई प्रांतास लागू आहे.

(३) तो, प्रांतिक शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

२. या अधिनियमात, विषय किंवा संदर्भ यामध्ये काहीही प्रतिकूल नसेल तर,— व्याख्या.

(१) "समपहृत केलेली जमीन" याचा अर्थ, शासनास देय असलेल्या जमीन महसुलाचे व इतर रकमांचे प्रदान न केल्याबाबत सन १९३० ते १९३४ यापैकी कोणत्याही वर्षांमध्ये सविनय कायदेभंगाच्या चळवळीच्या कालावधीत राज्याकडे समपहृत केलेल्या आणि हा अधिनियम अंमलात आल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत, प्रांतिक शासनाने **शासकीय राजपत्रात** प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनींपैकी कोणतीही जमीन, असा आहे. "जमिनीचे समपहरण" या संज्ञेचा अर्थ, त्यानुसार लावण्यात येईल;

(२) कोणत्याही समपहृत केलेल्या जमिनीच्या संबंधात, "मूळ धारक" याचा अर्थ, जमिनीचे समपहरण करते वेळी तिचा मालक असलेली व्यक्ती, असा आहे आणि यात तिच्या वारसांचा समावेश होतो ;

(३) "विहित" याचा अर्थ, नियमांद्वारे विहित, असा आहे ;

(४) "न्यायाधिकरण" याचा अर्थ, कलम ३ अन्वये घटित केलेले न्यायाधिकरण, असा आहे ;

(५) "नियम" याचा अर्थ, कलम १४ अन्वये केलेले नियम, असा आहे ;

(६) या अधिनियमात व्याख्या न केलेल्या परंतु भूमि संपादन अधिनियम, १८९४ (१८९४ चा १) यामध्ये व्याख्या केलेल्या संज्ञांना, त्या अधिनियमात त्यांना जो अर्थ नेमून दिला असेल तोच अर्थ असेल.

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई शासन राजपत्र, १९३८ भाग-५, पृ. ५५१ व ५५२ पहा ; विधानसभेतील कामकाजासाठी मुंबई विधानसभा चर्चा, १९३८, खंड-४, पृ. २८२७-२८९८,२९०२- २९८४ व २९८८-३६६५ पहा ; आणि विधानपरिषदेतील कामकाजासाठी मुंबई विधानपरिषद चर्चा, १९३८, खंड-४, पृ. ३०४-३६३ पहा.

न्यायाधिकरणाची रचना.

३. या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, प्रांतिक शासन, प्रांतिक शासन सदस्य म्हणून नियुक्ती करील अशा सदस्यांचे मिळून बनलेले एक न्यायाधिकरण घटित करील. जर न्यायाधिकरण एक सदस्याचे मिळून बनलेले असेल तर, एक सदस्य हा, आणि जर न्यायाधिकरण एकापेक्षा अधिक सदस्यांचे मिळून बनलेले असेल तर, अध्यक्ष हा, जो एखाद्या उच्च न्यायालयाचा न्यायाधिश आहे किंवा झाला आहे अशी व्यक्ती असेल.

पुनःस्थापित करण्याची गरज असलेली जमीन, घोषित करणे.

४. (१) प्रांतिक शासनास, जर समपहृत केलेल्या जमिनीपैकी कोणतीही जमीन, एखाद्या सार्वजनिक प्रयोजनार्थ गरजेची आहे आणि म्हणून, सार्वजनिक हितार्थ ती संपादित करण्यात यावी आणि मूळ धारकास ती परत करण्यात यावी अशी खात्री पटली असेल तर, उक्त जमीन अशा प्रयोजनार्थ गरजेची आहे अशी घोषणा करेल.

(२) अशी घोषणा, **शासकीय राजपत्रात** प्रसिध्द करण्यात येईल, आणि त्यात उक्त जमिनीच्या संबंधातील सर्व महत्वपूर्ण तपशील नमूद करण्यात येईल.

(३) अशी घोषणा ही, उक्त जमीन, अशा प्रयोजनार्थ गरजेची आहे याचा निर्णायक पुरावा असेल.

हितसंबंधित व्यक्तींना नोटीस.

५. (१) कलम ४ अन्वये घोषणा प्रसिध्द केल्यावर, न्यायाधिकरण, उक्त जमीन संपादन करण्याचा प्रांतिक शासनाचा इरादा असल्याचे दर्शविणारी जाहीर नोटीस, संपादित करावयाच्या जमिनीच्या किंवा जमिनीजवळील सोयीच्या ठिकाणी देण्याची व्यवस्था करील.

(२) अशा नोटीशीत, उक्त जमिनीचा तपशील देखील नमूद करण्यात येईल आणि उक्त जमिनीत हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तींना, तिच्यात नमूद केलेल्या वेळी व ठिकाणी (अशी वेळ ही, नोटीस प्रसिध्द केल्याच्या तारखेनंतर एका महिन्यापेक्षा आधीची नसेल), स्वतः किंवा अभिकर्त्याद्वारे न्यायाधिकरणासमोर उपस्थित राहण्यासाठी आणि उक्त जमिनीतील आपआपल्या संबंधित हितसंबंधाचे स्वरूप आणि अशा हितसंबंधाच्या भरपाईची रक्कम व त्यांच्या मागण्यांचा तपशील सादर करण्यासाठी फर्माविण्यात येईल.

(३) न्यायाधिकरण, कोणतेही असल्यास, अशा जमिनीच्या भोगवटादारावर आणि तिच्यात हितसंबंध असल्याची माहिती किंवा विश्वास असलेल्या सर्व व्यक्तींवर देखील तशाच अर्थाची नोटीस, नोंदणीकृत डाकेने बजावील.

(४) चौकशीची वेळ व ठिकाण त्यांना कळविणारी नोटीस, जमिनीचे मूळ धारक व जिल्हाधिकारी यांच्यावर देखील नोंदणीकृत डाकेने न्यायाधिकरणाकडून बजावण्यात येईल आणि ते अशा चौकशीमध्ये, एकतर स्वतः किंवा अभिकर्त्याद्वारे उपस्थित राहण्यास हक्कदार असतील.

विवरणपत्रे, इत्यादी करण्यास फर्मावण्याचा व भाग पाडण्याचा अधिकार

६. (१) न्यायाधिकरणास, जमिनीत हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, नमूद केलेल्या वेळी व ठिकाणी (अशी वेळ ही, अशा नोटीशीच्या तारखेपासून एक महिन्यापेक्षा आधीची नसेल), शक्य असेल तेथवर, सहमालक, पोट-मालक, गहाणदार, कुळ म्हणून किंवा अन्यप्रकारे जमिनीमध्ये किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये हितसंबंध असलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीचे नाव, आणि तिच्या बाबतीत मिळालेल्या किंवा मिळण्यायोग्य असलेल्या, कोणत्याही असल्यास, हितसंबंधाच्या आणि खंडांच्या व नफ्याच्या स्वरुपासंबंधीचा तपशील अंतर्भूत असणारे एक विवरणपत्र त्यास सादर करण्यासाठी किंवा सुपूर्द करण्यासाठी देखील लेखी नोटीशीद्वारे फर्मावता येईल.

(२) या कलमान्वये किंवा कलम ५ अन्वये विवरणपत्र सादर करण्यास किंवा सुपूर्द करण्यास फर्मावलेली प्रत्येक व्यक्ती, भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) याच्या कलम १७५ व १७६ च्या अर्थांतर्गत तसे करण्यास कायदेशिरपणे बांधील असल्याचे मानण्यात येईल.

**७.** (१) कलम ५ अन्वये न्यायाधिकरणाने दिलेल्या नोटीशीमध्ये निश्चित केलेल्या दिवशी किंवा ज्या दिवशी चौकशी स्थगित करता येईल अशा अन्य कोणत्याही दिवशी, न्यायाधिकरण,— न्यायाधिकरणाद्वारे चौकशी व निवाडा.

(एक) जमिनीकरिता द्यावयाच्या नुकसानभरपाईची रक्कम ; आणि

(दोन) नुकसानभरपाईचा दावा करणाऱ्या व्यक्तींचे संबंधित हितसंबंध,

याच्याशी संबंधित असणाऱ्या चौकशीची कार्यवाही करील.

(२) त्यानंतर न्यायाधिकरण, त्याच्या मते जमिनीसाठी जी नुकसान भरपाई देण्यात यावी त्या नुकसान भरपाईची रक्कम दर्शविणारा निवाडा देईल. असा निवाडा, लेखी स्वरुपात असेल आणि जेथे जमिनीमध्ये अनेक व्यक्तींचा हितसंबंध असेल त्याबाबतीत, निवाड्यात, प्रत्येकास द्यावयाच्या नुकसान भरपाईची रक्कम देखील दर्शविण्यात येईल.

**८.** या अधिनियमाद्वारे किंवा त्यान्वये अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या तरतुदी, शक्य असेल तेथवर, या अधिनियमाखालील न्यायाधिकरणासमोरील कोणत्याही चौकशीसाठी लागू असतील. न्यायाधिकरणासमोरील कार्यपध्दती.

**९.** (१) पोट-कलम (३), (४) व (५) च्या तरतुदींस अधीन राहून जमिनीसाठी द्यावयाच्या नुकसानभरपाईच्या रकमेमध्ये पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींसंबंधातील वजाती केल्यानंतर,– नुकसानभरपाईची रक्कम.

(क) जमिनीसाठी भोगवटा किंमत म्हणून प्रांतिक शासनास प्रदान केलेली रक्कम,

(ख) प्रांतिक शासनाने जमीन निकालात काढल्यानंतर, कलम ४ अन्वये घोषणा केल्याच्या तारखेपर्यंत त्या जमिनीवर सुधारणा करताना केलेल्या खर्चाची रक्कम,

(ग) प्रांतिक शासनाने जमीन निकालात काढल्यानंतर, निवाडा दिल्याच्या तारखेपर्यंत जमिनीच्या बाबतीत प्रदान केलेल्या जमीन महसुलाची रक्कम, आणि

(घ) निवाडा दिल्याच्या तारखेपर्यंत (क), (ख) व (ग) मध्ये नमूद केलेल्या रकमेवर दर साल ४ टक्के दराने व्याज असेल.

(२) द्यावयाची नुकसानभरपाईची रक्कम निर्धारित करताना, न्यायाधिकरण, पुढील बाबींच्या संबंधात वजाती करील :–

(क) पोट-कलम (१) च्या खंड (ग) मध्ये नमूद केलेल्या कालावधीत जमिनीपासून त्या त्या वेळी जमिन धारकाकडून मिळालेला, कोणताही असल्यास, नफा, आणि

(ख) पोट-कलम (१) च्या खंड (ग) मध्ये नमूद केलेल्या कालावधीत, त्या त्या वेळी जमीन धारकाने किंवा त्याच्या वतीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने केलेल्या कोणत्याही कृतीमुळे, जमिनीचे झालेले कोणतेही नुकसान, कायमस्वरुपी क्षति किंवा विनाश:

परंतु, पोट कलम (१) अन्वये द्यावयाची नुकसानभरपाईची रक्कम ही कोणत्याही बाबतीत, उक्त पोट-कलमाच्या खंड (क) व (ख) मध्ये नमूद केलेल्या एकूण रकमेपेक्षा कमी असणार नाही.

(३) जर त्या त्या वेळी असलेल्या जमिन धारकाने, कलम ५ अन्वये नोटीस प्रसिध्द केल्यापासून १५ दिवसांच्या आत, पोट-कलम (१) च्या खंड (क) व (ख) मध्ये नमूद केलेल्या रकमेइतकी रक्कम, उक्त पोट-कलमाच्या खंड (घ) मध्ये नमूद केलेल्या दराने व कालावधीसाठी तिच्यावरील व्याजासह नुकसानभरपाई म्हणून मिळण्यास आपण इच्छूक आहोत असे जिल्हाधिकाऱ्यास लेखी स्वरुपात कळविले असेल तर, जमिनीसाठी द्यावयाच्या नुकसानभरपाईची रक्कम ही,पोट-कलम (२) मध्ये नमूद केलेल्या बाबींपैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात त्यातून कोणतीही वजात न करता असणारी उक्त रक्कम असेल.

४. एखादा जमीनधारक प्रांतिक शासनाने ज्याची जमीन निकालात काढली त्या जमिनीचा तात्पुरता जमीनधारक नसून त्याने सद्‌भावपूर्वक त्या जमिनीची खरेदी केली असेल आणि ते प्रकरण १ एप्रिल १९३८ पूर्वी विचारार्थ असेल तर, अशा प्रकरणी, नुकासानभरपाईची रक्कम (क) अशा जमीनधारकाने जमिनीची किंमत म्हणून प्रदान केलेल्या रकमेइतकी आणि (ख) अशा जमीनधारकाने कलम ४ अन्वये प्रतिज्ञापत्र केल्याच्या दिनांकापर्यंत त्या जमिनीवर केलेल्या सुधारणेच्या रकमेइतकी असेल.

५. एखादी जमीन, सद्‌भावपूर्वक कर्जाऊ रक्कम दिलेल्या एखाद्या व्यक्तीच्या नावे तयार किंवा निर्माण करण्यात आलेल्या कोणत्याही गहाणाच्या किंवा आकारणीच्या अधीन असेल तर, अशा प्रकरणी, नुकसानभरपाईची रक्कम—

(क) मुद्दल रकमेच्या अदत्त शिल्लक रकमेइतकी आणि (ख) अशा व्यक्तीच्या ताब्यात ती जमीन नसेल तर, मुद्दलावर देय असलेली व्याजाची अदत्त रक्कम गहाण किंवा आकारणीच्या विलेखात विनिर्दिष्ट केलेल्या परंतु दरवर्षी ७½ टक्कयांहून अधिक नसेल अशा दराने, देण्यात येईल.

या पोट-कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, अशा व्यक्तीस गहाणदाराविरुद्ध किंवा त्याला देय असलेल्या शिल्लक रकमेच्या संदर्भात आकारणी करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध आपले अधिकार वापरण्याच्या हक्काला आडकाठी आणता येणार नाही.

(६) पोट-कलम (१), (३), (४) किंवा यथास्थिती, (५) अन्वये दिलेल्या नुकसानभरपाईच्या रकमेखेरीज; न्यायाधिकरण, उक्त रकमेच्या १५ टक्क्यांइतकी एकूण रक्कम प्रदान करील.

**स्पष्टीकरण :-** या कलमाच्या प्रयोजनार्थ "तात्पुरता जमीनधारक" याचा अर्थ, पोट-कलम ४ खालील प्रतिज्ञापत्राच्या दिनांकास त्या जमिनीचा मालक असलेली व्यक्ती, असा आहे.

नुकसान भरपाईच्या रकमांचे प्रदान करणे.

**१०.** (१) नुकसानभरपाईच्या रकमांची घोषणा केल्यानंतर जिल्हाधिकारी, त्यांचे हक्कदार असलेल्या व्यक्तींना घोषित केल्याप्रमाणे आणि पोट-कलम (२) मध्ये नमूद केलेली कोणतीही आकस्मिकता उद्‌भवल्याखेरीज प्रदान करील.

(२) ती रक्कम स्वीकारण्यास इच्छुक नसतील अशा व्यक्ती किंवा त्यांच्यापैकी, कोणत्याही कायदेशीर अपात्रतेखाली असणाऱ्या कोणत्याही व्यक्ती किंवा त्यांच्यावतीने कोणतीही व्यक्ती ती रक्कम स्वीकारण्यास सक्षम नसेल तर त्यांना मिळावयाची रक्कम किंवा यथास्थिति, तिचा काही भाग जिल्हाधिकाऱ्याकडे ठेवीच्या दिनांकापासून किंवा यथास्थिति ती रक्कम मिळण्यास हक्कदार असलेल्या व्यक्तीने कायदेशीर अपात्रतेमुळे ती रक्कम घेण्याचे थांबविल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीपर्यंत ठेव म्हणून राहील. उक्त कालावधी समाप्त झाल्यानंतर, अशी रक्कम, ती प्रदान करण्यात आली नाही तर व्यपगत होईल आणि प्रांताच्या महसूलखाली जमा होईल.

नुकसान भरपाईच्या रकमा देण्याऐवजी दुसरी व्यवस्था करणे.

**११.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, न्यायाधिकरण, प्रांतीक शासनाच्या मंजुरीने अशा कोणत्याही जमिनीबाबत नुकसानभरपाईची रक्कम देण्याऐवजी इच्छूक असलेल्या व्यक्तीला एकतर त्या जमीनीच्या बदली दुसरी जमीन देऊन किंवा त्याच्या समकक्ष असेल अशा इतर कोणत्याही रीतीने व्यवस्था करील.

**१२.** कलम ७ अन्वये न्यायाधिकरणाने दिलेली नुकसानभरपाईची रक्कम किंवा कलम ११ अन्वये केलेली कोणतीही व्यवस्था अंतिम असेल आणि ती जमिनीशी हितसंबंधित सर्व व्यक्तींना बंधनकारक असेल. प्रदान करावयाची रक्कम किंवा व्यवस्था अंतिम आणि निर्णायक असणे.

**१३.** (१) कलम ५. खालील नोटिस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसानंतर प्रांतिक शासन, कोणत्याही वेळी, कलम ४ खालील प्रतिज्ञापत्रात नमूद केलेल्या जमिनीचा ताबा घेण्याचे निदेश जिल्हाधिकाऱ्याला देईल आणि असे निदेश मिळाल्यानंतर जिल्हाधिकारी त्या जमिनीचा ताबा घेईल. प्रतिज्ञा पत्रानंतर घ्यावयाचा जमिनीचा ताबा आणि जमीन पूर्णतः प्रांतिक शासनाकडे निहित असणे.

(२) पोट-कलम (१) खालील जमिनीचा ताबा घेताना त्या जमिनीवर कोणतेही पिक असेल तर जिल्हाधिकारी हितसंबंधित व्यक्तींना, अशा पिकांसाठी, त्याला वाजवी वाटेल अशी नुकसानभरपाई देऊ करेल. अशा नुकसानभरपाईच्या रकमेबद्दलचा जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय पोट-कलम (३) मधील तरतुदींच्या अधीनतेने, अंतिम असेल. नुकसानभरपाईबद्दलचा असा प्रस्ताव स्वीकारण्यात आला नाही अशा प्रकरणी, जिल्हाधिकारी अशा नुकसानभरपाईची रक्कम ठेवीमध्ये ठेवील आणि कलम १०, पोट-कलम (२) च्या तरतुदी, शक्य असेल तेथवर, अशा ठेवींना लागू होतील.

(३) पोट-कलम (२) खालील नुकसानभरपाईच्या रकमेबाबत जिल्हाधिकाऱ्याच्या निर्णयामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती, उक्त निर्णयाच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत न्यायाधिकरणाकडे अपील करील. अशा अपिलावरील न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असेल.

(४) पोट-कलम (१) अन्वये, जिल्हाधिकाऱ्याने ताबा घेतल्यानंतर अशी जमीन सर्व भारांपासून मुक्त करुन पूर्णतः प्रांतिक शासनाकडे निहित करण्यात येईल आणि प्रांतिक शासन त्यास योग्य वाटेल अशा अटी व शर्तीवर ती जमीन मूळ जमीनधारकास परत करील.

**१४.** प्रांतिक शासन, या अधिनियमाची उद्दिष्टे पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ, नियम तयार करील. नियम.

---

शा.मु.औ. (एन) ३०९-६०५०-१२-०६.

शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद